!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४९५ ३०-४-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## कांद्यासह शेतमालाला दिल्या जाणारा मातीमोल भावाचा जाब केंद्र सरकारला विचारणार
## - खासदार चंद्रकांत खैरे

## लोणी येथील वाळकी नदीच्या पुनरुजीवनाचा खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते शुभारंभ

**लोणी खुर्द दि.०८**- वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द येथील वाळकी नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचा शुभारंभ शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते करण्यात आला. जलयुक्त शिवार व शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे शिवजल क्रांती योजने अंतर्गत वाळकी नदीच्या पुनरुजीवनाची सुरुवात आज करण्यात आली.

शिवसेनेने सातत्याने शेतक-यांच्या मदतीसाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली आहे. कोणताही भेदभाव न करता शिवसेना विकास करत असतांना शेतक-यांच्या हक्कासाठी लढा देत आहे. सातत्याचा दुष्काळ पदरी असतांना शेतक-यांनी सोन्यासारख्या पिकवलेल्या कांद्याला मातीमोल भाव मिळत आहे. त्याचा जाब या अधिवेशनात सरकारला विचारणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले. वैजापुरच्या सद्याच्या आमदारांने लोणीला न्याय दिला नसला तरी शिवसेना आपल्याला निराश करणार नाही, असे आश्वसानही त्यांनी यावेळी दिले.

जिल्हाप्रमुख अंबादास दानवे यांनी शिवजल क्रांती योजने अंतर्गत शिवसेनेने ३४ गावात कामे पुर्ण केली असुन ९० गावांचे लक्ष शिवसेनेचे असुन ५० कामे पावसाळयापुर्वी पुर्ण होतील अशी अपेक्षा व्यक्त केली. सव्वा दोन कोटी रुपये शिवसेनेने खर्च करुन शेतक-यांच्या हितासाठी हे काम हाती घेतले असल्याचेही त्यांनी सांगितले. वैजापुर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी हिताची पंचवीस ते तीस कोटी रुपयांची विकास कामे शिवसेनेने केली आहे. शिवाय शिवसेनेच्या हाती असलेल्या सोसायटया बाजार समित्यांनी महाराष्ट्रात चोख कामगिरीच्या माध्यमातून नाव लौकीक मिळवला आहे. प्रत्येक सुख-दुखा:त शिवसेना भेदभाव न करता सर्वांच्या सोबत आहे, त्यामुळे इतर पक्षातुनही शिवसेनेकडे येणारा ओढा आता वाढला असल्याचे माजी आमदार आर.एम. वाणी यांनी सांगितले. लोणी गावाचा विकास विद्यमान आमदार करु शकत नाही, अशी खात्री झाली त्यामुळे सहकार्यासह शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे सर्जेराव जाधव यांनी यावेळी स्पष्ट केले. गावाने सद्याच्या आमदारांना साथ दिली, परंतु कामाला माजी आमदार आर एम वाणी विकासाचा दृष्टीकोन ठेवून लोणीला साथ देत आहे. त्यामुळे यापुढे लोणी व पंचक्रोषीतील गावे शिवसेनेच्या पाठीशी राहतील, असा विश्वासही सर्जेराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्यासमवेत ग्रामपंचायत सदस्य सुशिला जाधव, ग्रामपंचायत सदस्य ललिता जाधव, सर्जेराव आबा जाधव, भिमराज पाटील तांबे, बाळासाहेब बागुल, रुख्मणबाई सोनवणे, शामराव सोनवणे यांनी शिवसेनेत खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते प्रवेश केला.

यावेळी जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, जिल्हा संघटक आनंदीताई अन्नदाते, तालुकाप्रमुख रमेश बोरनारे, आसाराम रोठे, नंदू शिंदे, साबेर भाई, विभागीय अधिकारी लक्ष्मीकांत साताळकर, उप विभागीय कृषी अधिकारी उदय देवळाणकर, तालुका कृषी अधिकारी व्ही बी मोरे, मंडळ कृषी अधिकारी सी एम डवणे, संजय पाटील निकम, रामहरी बापू, विठ्ठल डमाळे, सरपंच रिखबशेठ पाटणी, गोरख आहेर, भीमराज जाधव, शिकन सोमासे, सर्जेराव आबा, प्रकाश मतसागर, उपसरपंच वैशाली तांबे, श्रीमती पाटील, गोकुळ आहेर, ललिता जाधव, गुलाबराव मगर, अरुण सोमासे, टी एस जाधव, पांडुरंग जगदाळे, मधुकर पवार, मनोज सोनी, भरत साळुंके, बाबासाहेब कुंदे, मधुकर पवार, राजेंद्र चव्हाण, एन.डी.पाटील, तात्याराव जाधव, मगन जाधव, आदींसह पंचक्रोषीतील ग्रामपंचायत सदस्य, सहकारी सोसायटीचे पदाधिकारी, शिवसैनिक व युवासैनिकांसह गावक-यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525